**ठळक बातम्या**

- मेक इन इंडिया उपक्रमाला १० वर्ष पूर्ण, सर्व देशवासियांसह विकसित आणि आत्मनिर्भर भारत बनवण्याचा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा निर्धार

- जम्मू आणि काश्मीर विधानसभेच्या दुसऱ्या टप्प्यात २६ मतदारसंघात शांततेत मतदान सुरू

- गोल्डमन सॅक्सच्या अंदाजानुसार २०३० पर्यंत सर्वात वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थांमधे भारताचा समावेश

**आणि**

- मकाऊ खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारतीय खेळाडूंची विजयी सलामी

**<><><><><>**

केंद्र सरकारच्या मेक इन इंडिया उपक्रमाला आज १० वर्ष पूर्ण झाली. याबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशवासियांचं कौतुक केलं आहे. देशातल्या १४० कोटी नागरिकांचा एकत्र निर्धार यातून दिसून येतो. यामुळं विविध क्षेत्रातली निर्यात वाढली, उत्पादन क्षमतेचा विकास झाला आणि अर्थव्यवस्था मजबूत झाल्याचं प्रधानमंत्री म्हणाले. सुधारणांच्या मार्गावर देशाची प्रगती सुरू राहील आणि एकत्रितरित्या आपण आत्मनिर्भर आणि विकसित भारत बनवू असं त्यांनी सांगितलं.

गुंतवणूक वाढवणं, संशोधनाला चालना देणं, जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा उभारणं आणि उत्पादन, आरेखन आणि नवोन्मेष या क्षेत्रात देशाला

आघाडीचं स्थान मिळावं यासाठी सरकारनं हा उपक्रम सुरू केला होता. आता मोबाइल निर्यातीत भारत जगात दुसऱ्या स्थानी पोहोचला आहे. उत्पादन आधारित सवलत योजनेमुळं विविध क्षेत्रात सव्वा लाख कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक आली आहे. गेल्या दशकभरात तासाला एक या वेगानं स्टार्टअप देशात सुरू झाले आणि १५ लाख नागरिकांना रोजगार मिळाला. कोरोना लस उत्पादनातही भारतानं आघाडीच स्थान घेतलं आणि जगातल्या एकूण लशींपैकी निम्म्या भारतानं पुरवल्या.

**<><><><>**

बिहारच्या मारहोरा इथे सुरू असलेल्या रेल्वे इंजिन प्रकल्पातून प्रथमच निर्यातीची सुरुवात केली जाणार असल्याची माहिती रेल्वे मंत्रालयानं दिली आहे. वेबटेक लोकोमोटिव्ह प्रायवेट लिमिटेड आणि भारतीय रेल्वे यांनी संयुक्तपणे सुरू केलेल्या या प्रकल्पातून आफ्रिकेत रेल्वे इंजिनाची निर्यात करण्यात येईल. पुढच्या वर्षीपासून या इंजिनांची निर्यात सुरू होईल, असंही रेल्वे मंत्रालयानं म्हटलं आहे.

**<><><><>**

वक्फ सुधारणा विधेयकाचं पुनरावलोकन करण्यासाठी स्थापन झालेली संसदेची संयुक्त समिती आपला अहवाल हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्या आठवड्यात सादर करेल, अशी अपेक्षा केंद्रीय अल्पसंख्यक व्यवहार मंत्री किरेन रिजुजु यांनी व्यक्त केली. समितीला एक कोटीपेक्षा जास्त निवेदनं प्राप्त झाली असंही रिजुजु यांनी सांगितलं. केंद्र सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळाला शंभर दिवस पू◌ूर्ण झाल्याबद्दल रिजुजु दिल्लीत वार्ताहरांशी बोलत होते.

संयुक्त समिती विविध सरकारी आणि खासगी संस्थांकडून सूचना मागवत असून यावर व्यापक चर्चा सुरू असल्याचं ते म्हणाले. वक्फ कायद्यात याआधीही बदल झाले आहेत, मात्र यावेळी व्यापक चर्चा केली जात असून हे लोकशाहीसाठी चांगलं असल्याचं ते म्हणाले.

सरकारच्या या कार्यकाळाला शंभर दिवस पूर्ण झाल्यानिमित्त यावर्षी दिल्लीत लोकसंवर्धन पर्व आयोजित करण्यात येणार आहे. याद्वारे अल्पसंख्य समूदायातल्या कारागिरांना आपल्या हस्तकला आणि हातमागावर उत्पादित केलेल्या वस्तूंचं प्रदर्शन करता येणार आहे अशी माहिती रुजुजु यांनी दिली. चालू आर्थिक वर्षात अडीच लाख लाभार्थ्यांना एक हजार  कोटी रुपयांचं कर्ज दिल्याचंही त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

न्यायाधीशांनी सुनावणी दरम्यान कोणतीही पूर्वग्रहदूषित टिप्पणी करू नये अशी ताकीद सर्वोच्च न्यायालयाने दिली आहे. कर्नाटक उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांनी एका सुनावणीवेळी केलेल्या वादग्रस्त टिप्पणीवर सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालच्या पाच सदस्यीय पीठाने सुनावणी केली, त्यावेळी पीठाने ही ताकीद दिली. इलेक्ट्रॉनिक माध्यमाच्या या काळात न्यायालयाच्या सुनावणीचं वार्तांकन होतं, त्यामुळे न्यायाधीशांनी संयमानं व्यक्त व्हावं असंही सर्वोच्च न्यायालयानं म्हटलं आहे.

**<><><><><>**

जम्मू आणि काश्मीर विधानसभेच्या दुसऱ्या टप्प्यात सहा जिल्ह्यातल्या २६ विधानसभा मतदारसंघांसाठी मतदान होत आहे. सकाळी ११ वाजेपर्यंत एकूण २४ पूर्णांक १० शतांश  टक्के मतदान झालं आहे. या मतदारसंघांतल्या एकूण ३ हजार ५०२ मतदान केंद्रांवर आज सकाळी सात वाजल्यापासून मतदानाला सुरुवात झाली. या टप्प्यात सुमारे २५ लाख ७८ हजार मतदार २३९ उमेदवारांचं भवितव्य ठरवणार आहेत. मतदानाचा हक्क बजावण्यासाठी मतदारांच्या रांगा लागल्या असून सर्वत्र कडेकोट सुरक्षा व्यवस्था असल्याचं आकाशवाणीच्या वार्ताहरानं कळवलं आहे. दरम्यान, मतदान करून लोकशाही बळकट करण्यासाठी आपली महत्त्वाची भूमिका बजावावी, असं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात मतदारांना केलं आहे.

**<><><><><>**

जम्मू आणि काश्मीरमध्ये सुरू असलेल्या विधानसभा निवडणुकीची पाहणी करण्यासाठी १५ देशांमधल्या वरिष्ठ राजनैतिक अधिकाऱ्यांच्या उच्चस्तरीय शिष्टमंडळ आज काश्मीरला भेट दिली. यात अमेरिका, मेक्सिको, गयाना, दक्षिण कोरिया, सोमालिया, पनामा, सिंगापूर, नायजेरिया, स्पेन, दक्षिण आफ्रिका, नॉर्वे, टांझानिया, रवांडा, अल्जेरिया आणि फिलिपाईन्स या देशातल्या अधिकाऱ्यांचा समावेश आहे.

**<><><><><>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज दुपारी नाशिकमध्ये भाजपाच्या उत्तर महाराष्ट्रातल्या पदाधिकाऱ्यांची बैठक घेणार आहेत. यावेळी उपमुख्यमंत्री

देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, महाराष्ट्र प्रभारी भूपेंद्र यादव, राष्ट्रीय सहसंघटनमंत्री शिवप्रकाश यांच्यासह राज्यातले इतर नेते उपस्थित असतील. संध्याकाळी ते पश्चिम महाराष्ट्रातल्या पदाधिकाऱ्यांची कोल्हापूरात बैठक घेतील. राजकारणा कधी काय होईल, हे सांगता येत नाही. म्हणून २८८ जागांची तयारी केली असली तरी याचा अर्थ युती नको असा होत नसल्याचं भाजपा नेते चंद्रकांत पाटील यांनी सांगितलं.

<><><><><>

झारखंड विधानसभेची निवडणुकीत भाजपा, संयुक्त जनता दल आणि अखिल झारखंड विद्यार्थी संघटनेसोबत युती करणार आहे. तिन्ही पक्षांमध्ये जागावाटपाची चर्चा शेवटच्या टप्प्यात आहे. पुढच्या आठवड्यात जागा वाटप जाहीर केलं जाईल, असं भाजपाचे राज्य सहप्रभारी हिमंता बिस्व शर्मा यांनी सांगितलं.

<><><><><>

भारत २०३० पर्यंत सर्वात वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थांमधे असेल असं भाकित गोल्डमन सॅक्स या अमेरिकन कंपनीनं वर्तवलं आहे. मजबूत जीडीपी वाढ, आणि गुंतवणूकदारांचा सकारात्मक कल यामुळे  २०३० पर्यंत आर्थिक वाढीचा दर दोन आकडी असेल असं कंपनीचा अहवाल म्हणतो. जागतिक पातळीवर अनिश्चिततेचं वातावरण असूनही भारताची वाटचाल दृढपणे होत राहील. राष्ट्रीय शेअर बाजाराच्या निफ्टीची १८ टक्के वाढ गेल्या पाच वर्षात झाली असून वाहन उद्योग, बांधकाम क्षेत्र आणि रसायन उद्योगाकडे गुंतवणुकीचा ओघ पुनः पुन्हा येत राहील असा कंपनीचा अंदाज आहे.

भारतीय अर्थव्यवस्थेचा वाढीचा दर पुढच्या आर्थिक वर्षात ७ पूर्णांक १ दशांश टक्के राहील, असा अंदाज यापूर्वी मूडीज या पतमानांकन संस्थेनं प्रसिद्ध केला आहे. तर चालू आर्थिक वर्षात भारतीय अर्थव्यवस्थेची वाढ ६ पूर्णांक ८ दशांश टक्के दरानं होईल, असा एस अँड पी ग्लोबल रेटींग्ज या संस्थेचा अंदाज आहे.

**<><><><><>**

ज्येष्ठ चित्रपट निर्माती मधुरा जसराज यांचं आज मुंबईत वार्धक्यानं निधन झालं. त्या ८६ वर्षांच्या होत्या. प्रसिद्ध शास्त्रीय गायक पंडीत जसराज यांच्या त्या पत्नी होत्या. चित्रपती व्ही शांताराम त्यांचे वडील होते. प्रसिद्ध गायक संगीतकार शारंगदेव पंडित त्यांचे पुत्र तर गायिका दुर्गा जसराज या त्यांच्या कन्या आहेत. पंडित जसराज यांच्या जीवनकार्यावर आधारित संगीत मार्तंड पंडित जसराज या चित्रपटाची निर्मिती त्यांनी केली होती. २०१० मधे आई तुझा आशीर्वाद हा चित्रपट दिग्दर्शित करुन त्यांनी सर्वात वयस्कर चित्रपट दिग्दर्शक होण्याचा विक्रम लिमका बुकात नोंदवला होता. याखेरीज चित्रकला आणि शिल्पकलेतही त्यांनी भरीव योगदान दिलं.

मधुरा जसराज यांचं पार्थिव मुंबईत वर्सोवा इथल्या त्यांच्या निवासस्थानी ठेवण्यात आलं असून दुपारी साडेतीन वाजता अंत्ययात्रा सुरु होईल असं कौटुंबिक सूत्रांनी सांगितलं.

**<><><><><>**

मकाऊ खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी विजयी सलामी दिली. पुरुष एकेरीत अग्रमानांकित किदंबी श्रीकांतने इस्राएलच्या दुबेवेंको

दानिल चा २१-१५, २१-१४ असा पराभव करुन दुसऱ्या फेरीत प्रवेश केला आहे.

महिला दुहेरीतही भारताच्या गायत्री गोपीचंद आणि ट्रिसा जॉली यांची जोडी उपउपान्त्यपूर्व फेरीत पोहोचली आहे. पहिल्या फेरीत जपानच्या अकारी सातो आणि माया तागुची या जोडीचा त्यांनी 15-21, 21-16, 21-14 असा पराभव केला. आता त्यांचा सामना उद्या तैवानच्या जोडीशी होणार आहे. मिथुन मंजुनाथ, समीर वर्मा, चिराग सेन, आणि एस शंकर मुथुस्वामी यांचेही सामने आज होणार आहेत. महिला एकेरीत तान्या हेमंत, अनुपमा उपाध्याय, तस्नीम मीर, देविका सिहाग, इशाराणी बारुआ भारताची बाजू लढवतील. मिश्र दुहेरीत भारतीय जोड्यांचे सामनेही आज होत आहेत.

<><><><><>

सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखाली न्यायवृंदाने  मुंबई उच्च न्यायालयातल्या ९ ज्येष्ठ वकिलांच्या नावाची शिफारस  न्यायाधीशपदासाठी केली आहे. राजेश दातार, सचिन देशमुख, गौतम अंखड, महेंद्र नेर्लीकर, निवेदिता महेता, प्रफुल्ल खुबाळकर, आश्विन भोबे, रोहित जोशी आणि अद्वेत सेठना यांचा त्यात समावेश आहे.

//<><><><><>//